क्र. १२० पहिले वर्ष

१८ डिसेंबर २०२२

# रविवारची उपासना

## आगमनकाळातील चौथा रविवार

### प्रस्तावना

आगमनकाळातील चौथा रविवार. देवपुत्र कोणत्या घराण्यात कुणाच्या उदरी जन्माला येणार आहे, त्याचे नाव काय ठेवायचे व त्या नावाचा अर्थ काय? हे यशया संदेष्टा प्रकट करीत आहे. पवित्र मरीया ही सामान्य स्त्री असूनही देवावर पूर्ण श्रध्दा असल्यामुळे देवाच्या पुत्राची माता होण्याचे भाग्य तिला लाभले. परमेश्वर तिला सर्व संकटातून, दु:खातून व अडीअडचणीतून बाहेर पडण्यास मदत करील ह्या भक्कम विश्वासामुळे फक्त देवपुत्राचीच नाही तर आपल्या सर्वांची आई होण्याचे भाग्य तिला लाभले. आपल्या ह्या स्वर्गीय मातेप्रमाणे आपणही नम्रतेचे व विश्वासाचे जीवन जगावे म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, तुझ्यावरील प्रीतीने आमची हृदये भरू देत. तुझा पुत्र मनुष्य होऊन जन्म घेणार आहे हे तू आम्हांला दूताकडून कळवलेस. त्याचे दु:ख व मरण ह्याच्याद्वारे पुनरुत्थानाचे वैभव आम्हांला प्राप्त होवो. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, एकच परमेश्वर असून, सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

### पहिले वाचन

**यशयाच्या पुस्तकातून घेतलेले वाचन**

**७:१०–१४**

**''पाहा कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल.''**

परमेश्वर आहाजास आणखी म्हणाला, ''तुझा देव परमेश्वर याच्याजवळ तू आपणासाठी चिन्ह माग. ते खाली अधोलोकात असो किंवा वर उर्ध्वलोकात असो.'' आहाज म्हणाला, ''मी मागणार नाही. मी परमेश्वराची परीक्षा पाहणार नाही.'' तेव्हा तो म्हणाला, ''हे दाविदाच्या घराण्या, मी सांगतो ते ऐक : तुम्ही मनुष्यांस कंटाळा आणता हे थोडे झाले म्हणून माझ्या देवासही कंटाळविता काय? यास्तव प्रभू स्वत: तुम्हांस चिन्ह देत आहे. पहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल आणि त्याचे नाव इम्मानुएल (आमच्यासह देव) असे ठेवील.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**२३:१–२,३–४, ५–६**

प्रतिसाद : **''आपण प्रभूचे स्वागत करू या.''**

१. ही धरती प्रभूची आहे. इथले सारे काही त्याचेच आहे; हे जग आणि इते राहाणारे सारे देखील त्याचेच आहे. त्यानेच तर सागरांवर तिचा पाया घातला. भूमिगत जलाशयांवर तिची स्थापना केली. (प्र.)

२. प्रभूच्या पर्वतावर कोण चढेल? त्याच्या पवित्र क्षेत्रात कोण उभा राहील? ज्याचे हात निष्कलंक आणि अंत:करण शुध्द आहे, ज्याचे मन असत्याच्या मागे धावत नाही तोच. (प्र.)

३. त्याला प्रभूकडून आशीर्वाद प्राप्त होईल. उध्दारकर्त्या देवाकडून न्याय मिळेल. असेच लोक त्याला शरण येतात. याकोबाच्या देवाचे दर्शन घेऊ इच्छिणारे ते हेच. (प्र.)

### दुसरे वाचन

**संत पौलने रोमकरांस लिहिलेल्या पत्रातून घेतलेले वाचन १:१–७**

**''परमेश्वराचा पुत्र येशू ख्रिस्त हा दाविद वंशात जन्मला.''**

पवित्र जन होण्याकरिता बोलावलेले रोम शहरातील देवाचे प्रियजन ह्या सर्वांना प्रेषित होण्याकरिता बोलावण्यात आलेला, देवाच्या शुभवार्तेकरिता वेगळा केलेला, ख्रिस्त येशूचा दास पौल ह्याच्याकडून : ह्या शुभवार्तेविषयी देवाने पवित्र शास्त्रात आपल्या संदेष्ट्यांच्याद्वारे पूर्वीच वचन दिले होते. ही शुभवार्ता त्याचा पुत्र येशू आपला प्रभू ह्याच्याविषयी आहे. तो देहदृष्ट्या दाविद वंशात जन्मला आणि पवित्रतेच्या आत्म्याच्या दृष्टीने तो मृताच्या पुनरुत्थानाच्याद्वारे पराक्रमाने देवाचा पुत्र निश्चित ठरला. त्याच्याद्वारे आम्हांस कृपा आणि प्रेषितपद ही मिळाली. अशासाठी की, त्याच्या नावाकरिता सर्व राष्ट्रांमध्ये विश्वासाने आज्ञापालन व्हावे. त्यांच्यापैकी तुम्हीही येशू ख्रिस्ताचे होण्यासाठी बोलावलेले आहा. त्या तुम्हांस देव जो आपला पिता आणि प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून कृपा व शांती असो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय १:२३**

**आलेलुया, आलेलुया!**

''पाहा, कुमारी गर्भवती होईल आणि तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील.''

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**१:१८–२४**

**''दाविदाचा पुत्र योसेफ ह्याच्याशी वाग्दत्त झालेल्या मरीयेपासून येशूचा जन्म होईल.''**

येशू ख्रिस्ताच्या जन्माची घटना अशी घडली: त्याची आई मरीया हिचा योसेफाशी वाङ्‌निश्चय झाला होता. पण त्यांचे लग्न होण्यापूर्वीच, पवित्र आत्म्याच्या योगे ती गर्भवती असल्याचे दिसून आले. तिचा भावी पती योसेफ सज्जन होता. मरीयेची अब्रू चव्हाट्यावर मांडायची त्याची इच्छा नव्हती, म्हणून त्याने आपला वाङ्‌निश्चय गुपचूप मोडून टाकण्याचा बेत केला. हा बेत त्याच्या मनात घोळत असतानाच प्रभूच्या एका दूताने त्याला स्वप्नात दर्शन दिले आणि तो म्हणाला, ''दाविदाच्या पुत्रा, योसेफा, आपली बायको म्हणून मरीयेचा स्वीकार करायला मागेपुढे पाहू नकोस, कारण तिच्या पोटी पवित्र आत्म्याच्या योगानेच गर्भ राहिला आहे. तिला मुलगा होईल. तू त्याचे नाव येशू असे ठेव, कारण तोच

आपल्या लोकांना पापांपासून मुक्त करणार आहे.''

या घटना घडण्याचे कारण म्हणजे प्रभूने आपल्या प्रवक्त्यामार्फत वदवले होते, ''कुमारी गर्भवती होईल. तिला मुलगा होईल. त्याला इम्मानुएल म्हणजे आमच्यासह देव असे नाव पडेल.''

मग योसेफ जागा झाला. प्रभूच्या दूताच्या आदेशाप्रमाणे त्याने मरीयेशी लग्न केले.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक :**

माझ्या बंधूभगिनींनो, प्रभू येशू ख्रिस्ताच्या आगमनाची आम्ही तयारी करीत आहोत. त्याच्या दयेची आपण कळकळीने याचना करू या. दीन जनांना सुवार्ता घोषित करण्यासाठी आणि पश्चात्तापी पाप्याला बरे करण्यासाठी तो या जगात आला. आजच्या जगात त्याने पुन्हा यावे आणि सर्व गरजवंतांना मुक्तिदान द्यावे म्हणून आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद : ऐकावी प्रार्थना करितो मी याचना.**

१. ख्रिस्ताच्या आगमनाची तयारी करीत असताना आपले पोप महाशय, बिशप्स, धर्मगुरू व धर्मभगिनी, ब्रदर्स ह्यांच्याद्वारे सर्व मानवजातीला ख्रिस्ताचा मार्ग सापडावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. ख्रिस्ताच्या आगमनाची वाट पाहत असताना आपण सर्वांनी अंत:करणाचे पावित्र्य, शुध्दता राखून आपल्या आत्मिक सौंदर्याने ख्रिस्ताची वाट सजवावी म्हणून प्रार्थना करू या.

३. दु:खित, पीडीत जनतेला ख्रिस्ताचा आधार मिळावा. ख्रिस्तजयंतीच्या आनंदाचा व प्रेमाचा अनुभव सर्वांना व्हावा म्हणून प्रार्थना करू या.

४. जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटाला मरीयेप्रमाणे सामोरे जाण्यास परमेश्वराने आपल्याला धैर्य व सामर्थ्य द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**समारोप**

हे सर्वसमर्थ आणि नित्यजिवी परमेश्वरा, तुझ्यापासून कोणीही दूर जाऊ नये आणि सर्वांनी आपले तारण प्राप्त करून घ्यावे अशी तुझी मानवजातीकडून अपेक्षा आहे. तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या शांतीने तू जगाला मार्गदर्शन कर आणि मन:स्वास्थ्य व आनंद याद्वारे तुझ्या ख्रिस्तसभेला तुझी सेवा करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या पुत्राची माता मरीया हिला पवित्र आत्म्याच्या कृपादानाने तू पवित्र केलेस. त्याच कृपादानाने आम्ही तुला अर्पण करीत असलेली ही दाने पवित्र कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या ख्रिस्तप्रसादसंस्काराकडून आम्हांला तारणाचे अभिवचन मिळाले आहे. नाताळ जवळ येत आहे. आमचा मुक्तिदाता ख्रिस्त ह्याच्या आगमनाचा उत्सव साजरा करण्यासाठी श्रध्दा व भक्तिभाव यांनी आमची हृदये पूर्णपणे भरू देत. ही प्रार्थना आम्ही प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

प्रभूच्या आगमनाच्या अंतिम टप्प्यातील तयारी करण्यासाठी ख्रिस्तसभा आजच्या वाचनांतून तीन चिंतने सादर करते :

**अ) आगमनाआधी आपल्या संदेष्ट्यांकरवी परमेश्वर लोकांच्या मनाची पूर्वतयारी करतो :** इ.स.पू. ७३५- ७३३ दरम्यान इस्राएल आणि असिरीया ह्यांच्यात घनघोर युध्द लढले गेले. त्यावेळी यहुदाचा राजा आहाज ह्याने इस्राएलला साहाय्य करण्याऐवजी असिरियाचा आसरा घेतला. इ. स. पू. ७३३ मध्ये असिरियाने इस्राएलचा पराभव करताच यहुदा व जेरूसलेमसह आहाज राजा असिरियाचा अंकित बनला. परमेश्वराचे साहाय्य मिळविण्याऐवजी आजच्या पहिल्या वाचनात (यशया ७:१०-१४) सांगितल्याप्रमाणे आहाज राजकीय शक्तीवर विसंबून राहिला. परमेश्वराने मात्र ह्याच यहुदाच्या वंशात मसिहा जन्माला येईल असे भाकीत यशया संदेष्ट्याकरवी केले.

**ब) संदेष्ट्याचे भाकीत पूर्ण होण्याआधी परमेश्वर त्याचे स्पष्टीकरण करतो :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १:१८-२४) पवित्र मरीयेठायी येशू पवित्र आत्म्याने गर्भी संभवलेला आहे याविषयी योसेफ अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. मात्र वेळीच परमेश्वराच्या दूताने हस्तक्षेप करून योसेफला मार्गदर्शन केले. परमेश्वराचे कार्य समजून घेण्यासाठी त्याच्या मार्गदर्शनाची खूप गरज असते. त्याविना मोठा धोका संभवतो.

**क) प्रभू येशूठायी प्राप्त होणारे नवजीवन माणसाला नम्र बनविते :** आजचे दुसरे वाचन (रोम.१:१-७) रोममधील ख्रिस्ती लोकांना त्यांच्या पाचारणाची आठवण करून देते. येशूचा स्वीकार केल्यामुळे पवित्र होण्यासाठी जरी त्यांना बोलावण्यात आलेले असले तरी त्यांनी नम्रता सोडू नये हे संत पौल स्वत:ला 'प्रभूचा दास' म्हणवून स्पष्ट करतो.

**आत्मपरीक्षण :** परमेश्वराचा शब्द आणि त्याची कृपा ह्यांच्या आधारे मी प्रभूच्या आगमनाची तयारी कशाप्रकारे करीत आहे?

●●●

| डिसेंबर २०२२ | दैनंदिन बायबल वचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १९ | सं पोप अनास्तासियस (जां) | : शास्ते १३:२-७, २४-२५/लूक १ :५-२५ |
| मंगळ २० | सं डॉमणिक सिलोस (जां) | : यशया ७:१०-१४/लूक १:२६-३८ |
| बुध २१ | सं पीटर कनेशिअस (जां) | : गीतरत्न २:८-१४/लूक १:३९-४५ |
| गुरू २२ | सं फ्रान्सिस्का कॅब्रिनी (जां) | : १ शमुवेल १:२४-२८/लूक १:४६-५६ |
| शुक्र २३ | कॅन्टीचे सं जॉन (जां) | : मलाखी ३:१-४, ४:५-६/ लूक १:५७-६६ |
| शनि २४ | नाताळाचा जागरण विधी (जां) | : २ शमुवेल ७:१-१६/लूक १:६७-७९ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)